'कर्ज वसूली व अनुउत्पादीत कर्जाच्या आनुषंगाने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा विशेष अभ्यास (२००२- २०१२)

**पीएच.डी. संशोधन आराखडा**

वाणिज्य विद्याशाखा,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**संशोधक**

**शिवांगी संजयराव दहिटणकर**

*(एम.कॉम.,एम.फिल. जी.डी.सी. ॲन्ड.ए.)*

**संशोधन मार्गदर्शक**

डॉ. ब्रिजमोहन दायमा

*(एम.कॉम.जी.डी.सी. ॲन्ड ए.सेट,नेट पीच.डी.)*

*विभाग प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग,*

*दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर*


डिसेंबर - २०११

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये सहकार क्षेत्राचा विस्तार २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून झाला. भारताचा सहकारी चळवळीला फार मोठया व्यक्तींचे योगदान आहे. महात्मा गांधीनी १९१७ मध्ये मुंबई मध्ये भरवण्यात आलेल्या प्रांतीक सहकारी परिषदेत सहकारी चळवळीची नैतिक बाजू या विषयावर आपले विचार मांडले होते. त्याच परिषदेत श्री तालमाकी यांनी 'सहकारी संस्थांचे सामाजिक व शैक्षणिक कार्ये' हा प्रबंध सादर केला होता. या परिषदेने सहकारी शिक्षणाचा पाया घालण्याचे महत्वपूर्ण कार्ये केले आहे. त्या प्रेरणेतूनच १३ जूलै १९१८ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ स्थापन करण्यात आला. ११ ऑक्टोबर १९११ रोजी बॉम्बे सेंट्रल को- ऑफरेटीव्ह बँक स्थापन झाली. या बँकेचे मुख्य उदिष्ट प्राथमिक पतपुरवठा करणे हे होते या बँकेचे काही काळानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत रुंपातर झाले.

पहिली सहकारी संस्था व कायदा १९०४ साली झाला. १९५४ साली ग्रामीण पतसर्वेक्षण समीती नेमण्यात आली.भारतात शेती क्षेत्राला सहकारी पतपुरवठा करण्यासाठी राज्यपातळीवर पिरॅमिडच्या आकाराची त्रिस्तरीय रचना करण्यात आली. सहकारी शेती पुरवठयामध्ये प्राथमिक सहकारी पतसंस्था त्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक (शिखर बँक) असे तीन टप्पे अस्तित्वात आहेत.

जिल्हयाच्या आर्थिक जडण-घडणीत जिल्हा बँकेचे अनन्यसाधारण असून बँकेने मुळातच सामान्य माणूस केंद्रबिंदू माणून सार्वांगीण विकासावर भर दिलेला आहे.

* **अभ्यासाची गरज / महत्व :-**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून प्राथमिक सहकारी पत सोसायटयांना व सोसायटयांकडून प्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना पतपुरवठा केला जातो. एकंदरित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व संघटीत नाणे बाजार यांच्यात दुवा साधण्याचे महत्वपूर्ण कार्य शिखर बँक करत असते.

राज्य सहकारी बँक मुख्यत: राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून भाग भांडवल, जिल्हा बँकेकडील अतिरिक्त असलेला रोख पैसा, चालू व मुदत ठेवी, भारतीय स्टेट बँककडून घेतलेले कर्ज व नाबार्डकडून घेतलेले कर्ज या मार्गाने पैशाची उभारणी करीत असतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी निर्धारित काळात पैसा परत न केल्याने कर्जाच्या थकबाकीचा भला मोठा डोंगर तयार झाला आहे. सहकारी चळवळीच्या विकासात थकबाकीच्या स्वरुपात मुलभूत स्वरुपाचा अडसर निर्माण झाला आहे. याचा मुख्यत: गरीब शेतकऱ्यांवर व शेती विकासावर अनिष्ट परिणाम झाला आहे.

अशा वेळेसच लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपला एक वेगळा पॅटर्न तयार करुन मागील १० वर्षापूसन ऑडीट वर्ग 'अ' घेवून ही बँक संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्या नंबरवर आणण्याचे कार्य केले आहे. तर त्यांनी केलेल्या कर्जवसूलीची पध्दती पतपुरवठयाचे निकष, अनुत्पादीत कर्जाचे विवरण या प्रकारची सर्व माहीती घेवून सहकार क्षेत्राला एक वेगळी दिशा देवून त्याच प्रकारचे प्रयत्न महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये व्हावेत  व सहकार चळवळ प्रर्ध्दीगत होईल. शेतकऱ्यांच्या शेवटच्या घटकापर्यंत त्याचे फायदे पोहचावेत व शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवाव्यात त्यासाठी हे प्रयत्न. बँकेची सर्वांगीन उन्नती साध्य व्हावी, तिला स्थैर्य व समृध्दी लाभावी  व ती  स्वावलंबी व्हावी यासाठी संचालक मंडळ योग्य पध्दतीचे नियोजन करत असून ते अवलंबत आहेत.

## * संशोधन पध्दती :-

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा अभ्यास प्रामुख्याने दोन गटात विभागला आहे. एक म्हणजे प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत. प्राथमिक स्त्रोतातील माहीती गोळा करत असताना पुढील प्रकारातून केली जाईल.

i) **सर्वे पध्दती -** यामध्ये बँकेच्या १००० शेतकरी सभासदाकडे जावून त्यांना बँकेच्या संदर्भातील विविध प्रश्न विचारण्यात येवून प्रश्नावली तयार करण्यात येईल. लातूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातुन १०० शेतकऱ्यांची निवड करुन त्यांना प्रश्न विचारण्यात येईल.

ii) **मुलाखत पध्दती : -** बँकेच्या कर्मचाऱ्यांपैकी २५० कर्मचाऱ्यांची मुलाखत घेवून त्यांचे बँकेबाबतचे मत जाणून घेण्यात येईल. हे कर्मचारी प्रत्येक तालुक्यातुन २५ प्रमाणे राहतील.

iii) **निरिक्षण पध्दत -** अभ्यासादरम्यान बँकेच्या विविध शाखेला भेट देवून त्यांची कार्येपध्दतीचे निरिक्षण करण्यात येईल.

दुय्यम स्त्रोतातील माहिती ही पुढील घटकातून मिळवली जाईल -वार्षीक अहवाल ऑडीट रिपोर्ट त्यांनी सांगितलेली तोंडी माहिती, त्यांनी प्रकाशीत केलेली मॅगेझिन व प्रकाशीत पुस्तके.

या सर्वातुन माहिती गोळा करुन अहवाल सादर करण्यात येईल.

* **अभ्यासाचे हेतु :-**

१) बँकेने केलेल्या कर्ज पुरवठयाबाबत सविस्तर माहिती मिळवणे.

२) बँकेच्या उत्कृष्ट कर्जवसुली प्रमाणाची कारणे शोधणे

३) बँकेने दिलेल्या कर्जामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात पडलेला फरक पाहणे.

४) बॅकेच्या उत्कृष्ठ व्यवस्थापनाची कारणे शोधणे.

५) बँकेने विविध बचत गटासाठी केलेल्या कार्याची माहिती घेणे.

* **अभ्यासाची गृहीतके :-**

१) बँकेने भाग - भांडवल व सभासद संख्या सातत्याने वृध्दी दाखवत आहे.

२) बँकेमध्ये विविध प्रकारच्या ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

३) बँकेने दिलेल्या कर्जाच्या संख्येत व रक्कमेत वृध्दी झाली आहे.

४) अभ्यास कालावधीत कर्ज वसुलीचे प्रमाण वाढत आहे.

५) बँक मागील १० वर्षापासून नफ्यात आहे.

६) बँकेच्या ढोबळ अनुउत्पादक कर्जाचे प्रमाण ५ % पेक्षा कमी व निव्वळ अनुउत्पादीत कर्जाचे प्रमाण १ % पेक्षा कमी आहे.

* **अभ्यासाची व्याप्ती :-**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची व्याप्ती ही लातूर महसूली जिल्हापुरती मर्यादीत आहे. लातूर जिल्हा हा १६ मार्च १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्हयामध्ये विभाजन होऊन स्वतंत्र जिल्हा झाला. लातूर जिल्हयाला १० तालुके आहेत- औसा, रेणापूर, लातूर, उदगीर, चाकूर, निलंगा, शिरुर अनंतपाळ, जळकोट, देवणी, औसा. लातूर जिल्हयाची लोकसंख्या २३, ८७, ३४८ इतकी आहे. जिल्हा कार्यक्षेत्रात बँकेचे ध्येय धोरण प्रभावीपणे राबवणे, कर्ज पुरवठयाचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडणे, ठेवी, संकलीत करणे व ग्राहकांना बँकींग सेवा सुविधा पुरविणे सोईचे व्हावे म्हणून बँकेने एकूण १०३ शाखा व दोन विस्तार कक्ष कार्यरत ठेवलेले आहेत. लातूर जिल्हा हा मराठवाडयातील प्रगतीशील जिल्हा असून कर्नाटक राज्याला हया जिल्हयाच्या सिमा जोडलेल्या आहेत.

सन. १९८२ साली लातूर जिल्हा निर्मितीनंतर उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन होऊन लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अस्तित्वात आली व बँकेस रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकींग व्यवसायाचा परवाना क्र. (मुं.शे.का.) ०१ दि. ०८-१२-२००९ नुसार दिला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेस सहकारी अर्थ व्यवस्थेचे स्थान अनन्यसाधारण असून, जिल्हाब ॅंक ही ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू मानली जाते.

३१ मार्च, २०११ अखेर बँकेच्या सभासदांची संख्या १७४१ आहे त्यामध्ये वि.का.से. संस्था, पतसंस्था येतात. बँकेचे भाग भांडवल ३१ मार्च २०११ अखेर ४९८९ लाख एवढे आहे. बँकेच्या भाग भांडवल वृध्दीचा दर १२.३७ % आहे. बँकेच्या कर्मचारी वर्गाची संख्या ६०८ एवढी आहे.

शेती उद्योगातील भांडवली गुंतवणूकीच्या विविध कारणांसाठी मध्यम मुदती कर्जे, पाणी पुरवठा योजना, कृषी यांत्रिकीकरण इ. साठी मुंबलक प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देण्याचे बँकेचे धोरण आहे.

त्यामुळे बँकेची व्याप्ती जिल्हयातील शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर एवढया पुरतीच मर्यादीत नसून लोकसंख्येत ५० % हिस्सा असणाऱ्या  महिलांसाठीदेखील, महिला बचत गटाच्या माध्यमातून त्या आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हाव्यात यासाठी बँक कार्यरत आहे.

जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती होण्यासाठी आपसातील प्रगती तंत्रज्ञानाची देवाण घेवाण होण्यासाठीचे एक महत्वपूर्ण माध्यम म्हणून जिल्हयात मार्च-२०११ अखेर १७६ शेतकरी मंडळे नाबार्डच्या सहयोगातून कार्यान्वीत करण्यात आली आहेत.  या मंडळाच्या माध्यमातून बँक कर्जातून निर्माण केलेल्या उत्पन्नाच्या साधनांचा उपयोग पुर्ण कौशल्याने करुन उत्पादन क्षमता व उत्पन्न वाढविणे, वाढीव उत्पन्नातून बचत करणे व बचत केलेल्या रक्कमेतून बँक कर्जाची वेळेवर परतफेड करणे इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येते.

बँकेची स्थापना होऊन २९ वर्ष झाली आहेत.  तरी पण मी २००२-२०१२ या दहा वर्षाची बँकेची माहिती अभ्यासासाठी घेतली आहे.

महिला वर्गाचा आर्थिक विकास व्हावा, त्या आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हाव्यात या प्रमुख उद्देशाने बचत गट चळवळीची संकल्पना अस्तित्वात आली. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल, अशिक्षीत महिलांना बँकींग व्यवहारात समाविष्ट करुन घ्यावे व त्यांना बँकेच्या आर्थिक व्यवहाराची माहिती व्हावी हाही बचत गट योजनेचा एक उद्देश आहे.

सामान्य शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नासाठी आर्थिक हातभार लागावा म्हणून बँकेने नाविन्यपूर्ण अशी शुभ मंगल कर्ज योजना गेल्या चार वर्षापासुन राबवली आहे.

शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी कार्योन्वयीत केलेल्या शैक्षणिक कर्ज योजनेत देशांतर्गत शिक्षणासाठी रु. ५.००लाख व देशाबाहेरील शिक्षणासाठी रु.१५.०० लाखंची कर्ज मर्यादा निश्चित करण्यात आली.

जिल्हयातील साखर कारखानदारी वाढावी व शेतकऱ्यांच्या ऊस या नगदी पिकास योग्य भाव मिळावा या हेतूने जिल्हयातील ५ साखर कारखान्यांना खेळते भांडवल पुरविले आहे.

बँकेच्या आर्थिक विकासाचे व प्रगतीचे मुल्यमापन हे कर्ज वसुलीच्या प्रमाणावरुन केले जाते.नाबार्ड व राज्या बँकेच्या फेर कर्जमर्यादा रिझर्व्ह बँकेचे अनुत्पादीत जिंदगींचे (N.P.A.)  निकष हे सर्व कर्ज वसुलीशी निगडीत आहेत. याशिवाय वरिष्ठ बँकेचे फेर कर्जमर्यादा, व्याजदर हे सुध्दा अनुत्पादीत जिंदगीच्या प्रमाणाशी निगडीत आहेत.

जिल्हयातील शेतकरी सभासदांची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने बँकेमार्फत कृषि पतधोरणात अमुलाग्र बदल करुन, कृषी यांत्रिकीकरण,सुक्ष्म सिंचन (स्प्रिंक्लर) साधने खरेदीसाठी माफक व्याजदरानी कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. कृषी उत्पादन वाढीसाठी व नगदी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करुन, भरीव पिक कर्जाचा पुरवठा केला आहे. दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासन पुरस्कृत योजनेअंतर्गत स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना, स्वये सहाय्यता बचत गट, निवृत्ती वेतनधारकांसाइी अल्पमुदती कर्ज योजना, पगारदार नोकरांसाठी गृहकर्ज योजना अशा विविध योजनेद्वारे अहवाल वर्षात बँकेने गौरवास्पद कामगिरी पार पाडून बँकेच्या उपक्रमशील वाटचालीचा वेगळा ठसा उमटविला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी अर्थव्यवस्थेचे स्थान अनन्यसाधारण असून, जिल्हा बँक ही ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू  मानली जाते. झपाटयाने बदलणाऱ्या आर्थिक परिस्थितीत इतरांच्या तुलनेत सहकार क्षेत्रात बळकटी प्राप्त करुन देवून, जिल्हयातील शेतकरी, शेतमजूर,ग्रामीण कारागीर इ. घटकांच्या आर्थिक उन्नतीचे ध्येय साध्य करण्यासाठी कार्यक्षेत्रातील विविध प्रकारच्या सहकारी संस्था व संस्था सभासदांना गरजेअनुरुप  व पुरेशा प्रमाणात पत पुरवठा करुन बँकेने मोलाचे योगदान दिले आहे.

जिल्हा बँकेने जिल्हयातील शेती व बिगर शेती संस्था सभासदांच्या विकासासाठी काळानुरुप कर्ज विषयक वास्तव धोरण आखुन अंतिम लाभधारकास आर्थिक समृध्दी प्राप्त करुन देण्यासाठी जाणीव पुर्वक प्रयत्न केले आहेत.

**<u>प्रकरणांची रचना.</u>**

१. प्रस्तावना

२. संशोधन पध्दती

३. महाराष्ट्रातील सहकारी बँकांची कर्जवसुली व अनुत्पादक कर्जे

४. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे आर्थिक व्यवस्थापन

५. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कर्ज वसुली व अनुत्पादक कर्जे

६. निष्कर्ष व उपाय योजना.

**(शिवांगी संजयराव दहिटणकर )**
**संशोधक**

**(डॉ. ब्रिजमोहन दायमा)**
**मार्गदर्शक**

*****